AS


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


## कृषी तंत्र निकेतन पदविकाधारकांसाठी
## कृषी पदवीच्या थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश २०२१-२२

(सविस्तर माहितीसाठी कृपया www.mcaer.org किंवा https://maha.agriadmissions.in पहा)

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

कृषी पदवी अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी भाषा राहील.

**अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता व जागा**

| अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता व जागा |
|---|---|
| बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी) | कृषी तंत्र निकेतन पदविका (Agril. Polytechnic) (खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गासाठी किमान ५० टक्के गुणधारक) उत्तीर्ण. |
| | प्रवेश क्षमतेच्या २० टक्के अतिरिक्त जागा |

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील कृषी तंत्र निकेतन पदविकाधारकांसाठीची प्रवेश प्रक्रिया मे.एसएमबी सिस्टमस् प्रा.लि., मुंबई (एसएमबी) यांचेद्वारा 'ऑनलाईन पध्दती'ने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'एसएमबी' च्या अनुक्रमे www.mcaer.org व https://maha.agriadmissions.in या संकेतस्थळांवर दि. २२ ऑक्टोबर,२०२१ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुकांनी 'https://maha.agriadmissions.in' या संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

advt17

प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-

- उमेदवारांने **https://maha.agriadmissions.in** या संकेतस्थळाद्वारे दि. २२/१०/२०२१ ते ०२/११/२०२१ दरम्यान ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकीग किंवा इतर डिजीटल पध्दतीने भरावे.

प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-

खुल्या प्रवर्गासाठी रु. १०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ५००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.प्र*, आर्थिक दुर्बल घटक)

[आर्थिक दुर्बल घटक वगळता जात वैधता प्रमाणपत्र तसेच *उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश कार्यपध्दती इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका दि. २२ ऑक्टोबर,२०२१ पासून उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/३२२१/ २०२१
दिनांक- १२ ऑक्टोबर,२०२१

(विश्वजीत माने)
महासंचालक
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे